संरचना, संकल्पना आणि आविष्कार

६ मार्च १९९९

१० रुपये

# गृहसजावट विशेषांक

# साप्ताहिक सकाळ







गृहसजावट । अश्विन/अंजली लव्हेकर

# पाचशे चौरस फुटाचं घर कसं मोठ्ठं केलं ?

लहान वास्तूची अंतर्गत सजावट, हा आमचा जिव्हाळ्याचा विषय आहे. याला कारण म्हणजे आम्हाला या बाबतीत असलेला 'फर्स्ट हँड' अनुभव. उच्च शिक्षणानिमित्त बाहेर पडून शहरात राहिलेले आम्ही, आतापर्यंत संपूर्ण शहरी बनलो आहोत. शहरातील सुखसोयी या आमच्या जीवनसरणीतला अविभाज्य घटक बनला आहे. अशाच एखाद्या मोठ्या शहरात तुमच्या-आमच्यासारखा सामान्य माणूस स्वतःच्या वास्तूचं स्वप्न पाहतो. सर्वसाधारणपणे जागा घेऊन वास्तू बांधणं, हे शहरातील अतिश्रीमंत लोकांनाच शक्य आहे. त्यामुळे बंगले कमी व 'अपार्टमेंट्स'वाले अधिक, असं शहराचं रूप दिसतं. अशाच एका अपार्टमेंटमध्ये आपला फ्लॅट असावा, असं प्रत्येकालाच वाटत असतं. एकत्र परिवारपद्धती लुप्त झाल्यामुळे आपल्या लहानशा कुटुंबासाठी मध्यमवर्ग घर शोधत असतो. आपले सगेसोयरे जवळपास असतील, अशी वस्ती शक्यतो आपण बघतो. बायको-मुलं व खिसा यांना पटेल असा एखादा फ्लॅट बुक करतो आणि घराचा ताबा मिळताक्षणीच या मंडळींच्या लक्षात येतं, की आपलं सामान घरात मावणं निव्वळ अशक्य आहे. मग मनात विचार येतो, घर थोडं अजून मोठं असतं तर?

बाहेरून वास्तू कशी दिसते, यावर तुमचं नियंत्रण नसतं. (तो हक्क वास्तूबद्दल आपलेपणा व संक्षमता नसलेल्या बिल्डर व तो तसा आराखडा करणाऱ्या वास्तुविशारदाचा आहे.) परंतु आपणच निरखून-पारखून पसंत केलेल्या घराबद्दल खोड्या काढणं, हा 'सामान मावत नाही' यावरील उपाय नव्हे. घर किती मोठं असावं याला सीमा नाही; पण लहान घराची सीमा लक्षात घेऊन आतील जागा हुशारीनं वापरणं, यातच खरी मजा आहे.

पूर्वी घरातील माणसांमुळे घराला घरपण येत असे. आता घरातील चार भिंतींनाच जिवंत बनावं लागतं. घरात इन-मीन-तीन माणसं. आई-वडिलांची नोकरी व मुलांच्या शिक्षणानिमित्त ती बाहेर पडणार. घरात राहणार कोण व किती वेळ? अशा वेळेस भिंतींनाच घराला घरपण आणलं पाहिजे. अंतर्गत सजावट हा विषय येथेच कामी येतो.

आपल्या गरजा वाढल्यामुळे किंवा सर्व सुखसोयी सहज उपलब्ध झाल्यामुळे किंवा आपल्याला सतत कमी पडणाऱ्या वेळेमुळे हल्ली प्रत्येक घरात टीव्ही, फ्रीज, म्युझिक सिस्टिम, वॉशिंग मशिन, फूड प्रोसेसर इतपत वस्तू कमीत कमी असतातच. कॉम्प्युटरसुद्धा हळूहळू घरातील एखाद्या कोपऱ्यावर हक्क सांगू लागला आहे. अशा परिस्थितीत जागा कमी पडते, ही तक्रार वारंवार येणारच. म्हणूनच लहान जागेसाठी अंतर्गत सजावट करण्याच्या हिशोबानं काही गोष्टींचा विचार करणं अत्यंत आवश्यक आहे. प्रथम सर्वांत महत्त्वाचं म्हणजे संपूर्ण घराचा, बांधकाम चालू असतानाच विचार करावा म्हणजे नंतरच्या तोडफोडीचा खर्च व वेळ वाचतो.

१) आपल्या घरात आपण ज्या सोयीच्या वस्तू घेऊ इच्छितो, त्या वस्तूंचे आकार आणि माप आधीच





**१) अनौपचारिक पद्धतीची बैठक. हायडेन्सिटी फोमच्या ठोकळ्यांनी बनवलेली.**

**२) बाकी सर्व खोली पांढरी स्वच्छ असल्यानं, बेडमागील लाल काळी भिंत लक्ष खेचून घेते.**

**३) किचनमध्ये दिसणारे विचार करून केलेले स्टोअरेज. पांढऱ्या रंगामुळे बोजड दिसत नाही.**

लहान जागा, हा शहरात राहणाऱ्या बहुतेक सगळ्यांचा प्रश्न. हीच लहान जागा ऐसपैस वाटेल, तिचा जास्तीत जास्त उपयोग करता येईल, अशी अंतर्गत रचना आणि सजावट करता आली, तर केवढी अडचण दूर होईल? अंजली आणि अश्विन लव्हेकर या पुण्यातल्या दाम्पत्यानं आपल्या ५२० चौरस फुटांच्या फ्लॅटची अशीच वेगळी मांडणी केली आणि हे छोटंसं घर सर्व गरजा भागविणारं आणि सुखसोयींनी सज्ज झालं. या सजावटीसाठी त्यांना १९९८ चा 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिरिअर डिझायनर्स' या संस्थेचा पुरस्कारही मिळाला. त्यांचं घर आणि त्याची रचना याबद्दल त्यांच्याच शब्दांमध्ये. अनेकांना त्यापासून प्रेरणा आणि नव्या कल्पना मिळू शकतील.




**४) लहानसं फोल्डिंग टेबल तीन लोकांना जेवायला पुरेसं आहे. इतर वेळी सर्व्हिंग टेबलसारखं वापरलं जातं.**




माहीत करून घेणं फायद्याचं ठरतं. ठराविक जागा एक-दीड इंचानं कमी-जास्त झाली, की नंतर वाईट वाटून घेण्यात अर्थ नसतो.

२) ओट्यावरील आपल्याला नेहमी लागणाऱ्या वस्तूंची यादी तयार करावी. एकाच वेळेस टोस्टर, मिक्सर, ओव्हन लागणार आहेत का, याचा विचार करून किचन काउंटर ठरवता येतो.

३) आठवड्यात सहा वेळा जर घरातील लोक एक-एक करून जेवणार असतील, तर अशा घरात सहा किंवा आठ लोकांचं डायनिंग टेबल म्हणजे एक बोजा होतो. ते एक पसारा करण्याची जागा/अभ्यासाची जागा, असं धूड होऊन बसतं.

४) चार लोकांचं कुटुंब असलेल्या घरात साठवणीचं सामान कमी केलं, तर स्वयंपाकघर सुटसुटीत होऊ शकतं. ५० किलो/१०० किलो अशा पोत्यांनी सामान भरायचे दिवस आता राहिले नाहीत.

### वस्तूंसाठी लहान लहान जागा करा

आपल्या सवयी, आपली कामं यांना सोयीची अशी अंतर्रचना महत्त्वाची असते. आपल्या सर्व कामांची आणि कुटुंबातल्या प्रत्येक व्यक्तीच्या गरजांची यादी तयार करावी. लहान जागेत खूप गोष्टींसाठी लहान लहान जागा करणं सोपं असतं. सर्व गरजांसाठी एकाच ठिकाणी सोय करणं लहान जागेत अवघड असतं. म्हणून एक मोठं युनिट करून त्यातच टीव्ही, त्यातच पुस्तकं, त्यातच क्रोकरी, त्यातच सर्व काही- हे लहान जागेत फार बोजड दिसू शकतं. याच सर्व गोष्टींसाठी योग्य ठिकाणी लहान जागा केल्या तर ते सुबक दिसू शकतं.

हॉलमध्ये पाच-सहा माणसं गर्दी न करता बसावीत अशी अपेक्षा असेल, तर शक्यतो दोन्हीकडून बंद असलेला बटबटीत वा मोठा फोमचा सोफा टाळावा. गडद रंग किंवा पॉलिश यामुळे फर्निचर जड दिसू शकतं. सुटसुटीत, सरकवता येईल असं केन किंवा हलके, सुबक लाकडी सीटिंग ठेवल्यास सोयीचं जाऊ शकतं.

### ट्यूब लावून लाइटिंग संपत नाही

घर जरी लहान असलं व दिवसा उजेड भरपूर असेल तर ठीकच; पण तसं नसेल तर जास्त प्रमाणात उजेड आत येईल, तो रिफ्लेक्ट होईल या विचारानं फर्निचर, त्याची रचना व रंगसंगती ठरवावी. संध्याकाळचं व रात्रीचं लाइटिंग हे पुरेसं आहे, याची खात्री करावी. घरात दोन ट्यूब लाइट

लावून हा विषय संपत नाही. 'टास्क लाइटिंग', 'इफेक्ट लाइटिंग' हे प्रकार हे भिंतींना खरोखरच जिवंत करू शकतात. स्वयंपाकघर, वाचन व अभ्यास करण्याच्या जागा, या ठिकाणी उजेड भरपूर असणं आवश्यक आहे. इतर ठिकाणी डेकोरेटिव्ह फिटिंग वापरून त्या भिंतीची शोभा वाढवता येते. अशा वेळेस सर्व लाइट चालू ठेवणं जरुरीचं नसतं. एखादाच पिक्चर लाइट किंवा टेबल लाइट चालू ठेवून घरातील जागेचा मूड बदलता येतो. तीच लिव्हिंग रूम सकाळ-दुपार-संध्याकाळी वेगवेगळी दिसू शकते.

रंगसंगती ही एखाद्या जागेकडे लक्ष खेचून घेण्यासाठी वा तेथे दुर्लक्ष होण्यासाठी उत्तमपणे वापरता येते. गडद रंग आवडत असतील, तर ते एखाद्याच भिंतीला देऊन तिला उठाव आणता येतो.

स्वयंपाकघर हे फिकट रंगाचं असावं. स्वयंपाकघरात काळ्याव्यतिरिक्त इतर रंगाचा ग्रॅनाईट वापरल्यास त्या जागेची मर्यादा लगेच लक्षात येते. म्हणून शक्यतो वेगळ्याच रंगाचा ओटा वापरून तिकडे लक्ष खेचू नये. घरातील बऱ्याचशा भिंती नॅचरल रंगाच्या असतील, तर त्यावर तुमच्या हॉलमधील कुशन-सोफा कव्हर्समधील रंगसंगती चांगली खुलू शकेल.

घरातील भिंतींवर योग्य ठिकाणी लावलेलं आर्टवर्क - मग ते चित्र असो, शिल्प असो, कॅलेंडर असो की फॅब्रिक असो- हे घरात योग्य तो इंटरेस्ट निर्माण करतं. तसंच जमिनीवर योग्य रंगसंगतीची सतरंजी किंवा कार्पेट घातल्यास त्या ठराविक जागेला एक व्हिज्युअल बाऊंडरी मिळते. घरात सतत ठेवलेली फुलं/झाडं ही खरोखरीच घराला घरपण आणतात.

घर जरी लहान असलं, तरी वरील सर्व गोष्टींचा विचार केला गेला, तर ते एक सुटसुटीत व आल्हाददायक घर होऊ शकतं. मनाला आनंद देणारी जिवंत वास्तू होऊ शकते. घरी येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या मनासही भावते.

एक नीट पद्धतशीर विचार करून सजवलेली वास्तू, ही स्क्वेअर फूट जागेचं क्यूबिक फूट जागेत रूपांतर करू शकते. हीच आजच्या घडीची गरजही आहे. या गोष्टीचा पुरावा म्हणजे आमच्या ५२० स्क्वेअर फुटाच्या घराला I.I.I.D. चं मिळालेलं पहिलं पारितोषिक.

आयआयडी-एम. के. इंडिया ॲवॉर्ड्स ९८, एक्सलन्स इन इंटेरिअर डिझाइन रेसिडेन्शिअल कॅटेगरी - यंग डिझाइन प्रॅक्टिस.)

आमचं हे घर आपणास वर सांगितलेल्या तत्त्वांवर बेतलेलं आहे. हे आमचं लहानसं घर, या सर्व गोष्टी पुस्तकी नाहीत, तर एक व्यावहारिक उदाहरण म्हणून आपण त्याच्याकडे बघू या!

## आमच्या घरात आम्ही काय आणि कसं केलं?

आम्हीसुद्धा सर्वसामान्य शहरी मध्यमवर्गीय आहोत. फरक इतकाच, की पाच वर्षांच्या आर्किटेक्चरच्या डिग्रीनं व नंतरच्या सहा-सात वर्षांतील या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभवानं आमच्या मनाला एक प्रकारची शिस्त लागली आहे. जागा किंवा वास्तू पाहताक्षणीच (ती लहान असो वा मोठी) ताबडतोब मनात एक ढोबळ आराखडा तयार होतो. जागा लहान असल्यास कोपरा न् कोपरा वापरता कसा येईल, याकडे कल जातो, तर मोठी असल्यास त्या जागेकडे सौंदर्य दृष्टिकोनातून पाहिलं जातं.

आम्ही जेव्हा आमचा लहानसा फ्लॅट बुक केला, तेव्हा आमच्या सर्व मित्रमंडळींमध्ये तो एक कुतूहलाचा विषय होता. आता हे दोघं या घराचं काय रूप बदलतात? त्यांच्या दृष्टीनं वेगळ्याच असलेल्या आमच्या आवडीनिवडी आम्ही कशा सांभाळतो, हे बघायला ही मंडळी फारच उत्सुक होती. घरात काम सुरू असतानाच हे काहीतरी वेगळं होतंय खरं, म्हणून प्रेक्षणीय स्थळ असल्यासारखं कॉम्प्लेक्समधील लोक सतत येऊन कामाची प्रगती पाहत असत. (त्यामुळे आम्हाला सुपरव्हिजनची अजिबात कमी नव्हती!) साईटवर ड्राईंग होतं. त्याप्रमाणे डोळ्याला दिसलं नाही तर ताबडतोब ऑफिसमध्ये कोणाचा तरी फोन येत असे. 'अमुक-तमुक गोष्ट ड्राईंगप्रमाणे दिसत नाही म्हणून फोन केला. सहज पाहायला गेलो होतो म्हणून लक्षात आणून दिलं!' तर असा आमचा ओळखीच्या व अनोळखी लोकांनी हातभार लावलेला फक्त ५२० स्क्वेअर फूट बिल्टअप क्षेत्रफळ असलेला (बाल्कनी धरून) फ्लॅट- नव्हे 'घर.' !

इतर अनेक तरुण जोडप्यांसारखंच दोघांचंही करिअर महत्त्वाचं असलेले आम्ही दोघं. आमच्या गरजाही तशा वाढीव गरजाच होत्या. पुणे शहरानं आमचं मित्रमंडळही पुष्कळ वाढवलं आहे. मुंबईत वाढलेले आम्ही! आम्हाला संध्याकाळी एकमेकांच्या घरी जाणं, ही गोष्ट (तेही शॉर्ट नोटिसवर) तशी नवीनच होती. पण आता मात्र आमचा मित्रपरिवार हे घर खरोखरीच आपलं घर समजून येतो. **पान ७७ पाहा**



**पांढऱ्या शेल्फांमागं कॉलम दडला आहे व कपाटामागं फ्रीज लपून हे डिव्हायडर युनिट झालं.**